महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

दैनिक जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ ०९ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३४१ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# जनतेने ज्यांना नाकारले, ते जनादेशाला नाकारतात


## देवेंद्र फडणवीस यांचे राहुल गांधींच्या लेखाला - लेखानेच प्रत्युत्तर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

2024 मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकाया लोकशाही यंत्रणेमध्ये हेराफेरी करण्यासाठी तयार केलेला मॅच फिक्सिंगचा आराखडा होता. आता हेच प्रकार बिहारमध्येही होणार आहे. भाजपला जिथे जिथे हार पत्करावी लागते तिथे अशा प्रकारची गैरकृत्ये केली जातात, अशी घणाघाती टीका लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. राहुल गांधी यांनी एका इंग्रजी वृत्तपत्रात लिहिलेला 'मॅच फिक्सिंग महाराष्ट्र' हा लेख एक्स प्लॅटफॉर्मवर शेअर केला. त्यात त्यांनी गंभीर आरोप केले. राहुल गांधींच्या या आरोपावर आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखानेच प्रत्युत्तर दिले आहे. 2024 मध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांत मतदानाच्या दिवशी संध्याकाळी 5 वाजेपर्यंत 58.22 टक्के मतदान झाले होते; पण त्यानंतरही हे आकडे वाढत गेले. मतदानाची अंतिम टक्केवारी 66.05 टक्के असल्याचे दुसऱ्या दिवशी सकाळी सांगण्यात आले. म्हणजे या मतांमध्ये 7.83 टक्क्यांची वाढ झाली. राज्यातील केवळ 12000 बूथमध्ये नव्या मतदारांची भर पडली. त्यातील 85 मतदारसंत भाजपला विजय मिळाला होता, असा दावा राहुल गांधींनी केला. यावर देखील देवेंद्र फडणवीसांनी उत्तर दिलं आहे. शेवटच्या तासात मतदान वाढलेल्या जागी एनडीए जिंकली म्हणणे हास्यास्पद आहे. कामठीचे उदाहरण त्यांनी दिले. पण जे उदाहरण त्यांनी दिले नाही, ते मी येथे देतो आहे. माढ्यात शेवटच्या तासात 18 टक्के मतदान झाले,तिथं शरद पवार गटाचा उमेदवार जिंकला. वणीत शेवटच्या तासात 13 टक्के मतदान झाले, तिथे उद्धव ठाकरे गटाचा उमेदवार जिंकला आणि श्रीरामपूरमध्ये 12 टक्के मतदान झाले, तिथं काँग्रेस विजयी झाली, असं देवेंद्र फडणवीसांनी प्रत्युत्तर दिले.

### राहुल गांधींच्या आरोपावर देवेंद्र फडणवीस काय काय म्हणाले?

राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाबाबत काही पुरावे उपस्थित केले आहेत. निवडणूक आयोग त्यांना नक्कीच उत्तर देईल. पण मुख्य मुद्दा म्हणजे लोकशाही प्रक्रियेचा आणि लोकांच्या जनादेशाचा सतत होणारा अपमान...जनतेने राहुल गांधींना नाकारले आहे आणि सूड म्हणून ते जनतेला आणि त्यांच्या जनादेशाला नाकारत आहेत. यामुळे काँग्रेस पक्ष आणखी अडचणीत येईल. त्यांच्याच पक्षाचे आमदार एका दिवसात कोणालाही भेटण्याची वेळ मिळावी असे आव्हान देणारी विधाने का करतात याचे त्यांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे. लोकशाही प्रक्रिया आणि सवैधानिक संस्थांबद्दल सतत शंका उपस्थित करून ते देशाला कोणत्या दिशेने घेऊन जात आहेत आणि कोणते विष पसरवत आहेत याची त्यांना जाणीव असली पाहिजे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.



### मी महाराष्ट्रातील जनतेच्या या अपमानाचा नेहमीच निषेध करेन - देवेंद्र फडणवीस

मतदानापासून ते मतदारांच्या संख्येपर्यंत, राहुल गांधी खोट्या अफवा निर्माण करण्यासाठी, लोकशाही प्रक्रिया आणि सवैधानिक संस्थांबद्दल शंका निर्माण करण्यासाठी पुरावे विकृत करतात. महाराष्ट्रातील पराभवामुळे त्यांना आणि त्यांच्या मित्रपक्षांना किती दुःख झाले आहे हे मला माहिती आहे. पण जर तुम्ही महाराष्ट्रातील शेतकरी, लाडकी बहिणी, सामान्य जनता आणि सर्व नागरिकांच्या जनादेशाचा अशा प्रकारे अपमान करत राहिलात तर महाराष्ट्रातील जनता तुम्हाला कधीही माफ करणार नाही. मुख्यमंत्री म्हणून आणि त्यांचा सेवक म्हणून मी महाराष्ट्रातील जनतेच्या या अपमानाचा नेहमीच निषेध करेन, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.



थोडक्यात महत्वाचे

## आर.टि.ओ. अधिकाऱ्यांचे ओहरलोड वाहतुकीकडे दुर्लक्ष



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड -प्रतिनिधी :** म्हाडस येथे गेले अनेक वर्ष सुरु असलेल्या स्टोन क्रेशरमधुन मोठ्या प्रमाणात गौण खनिज काढण्याचे काम सुरु असून याची नढई -नारिवलि रस्त्याने रात्रं-दिवस अवजड डंपरद्वारे वाहतूक होत असून क्षमतेपेक्षा अधिक खडिचा माल या डंपरने मुंबई ,ठाणे येथे नेला जात आहे.या अवजड वाहतुकीमुळे नढई- म्हाडस रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून त्याचा त्रास या मार्गावरून वाहतूक करणारे शेकडो वाहन चालकांना होत आहे. प्रत्यक्ष माल वाहतुकीच्या परवान्या पेक्षा सुमारे दिडपट माल या डंपरद्वारे होत असून कल्याण उपपरिवहन विभागाचे अधिकारी (आर.टि.ओ) या ओहरलोड वाहतुकीवर कोणतिच कारवाई करत नसल्याने या परिसरातील नागरिकांना जिव मुठित घेऊन प्रवास करावा लागत आहे या ओहरलोड वाहतुकीच्या अनेक तक्रारी यापुर्वी आर.टि.ओ.कार्यालयात केल्या असूनही आर्थिक हितसंबंधांमुळे अधिकारी कारवाई करत नसल्याचे दिसत आहे. दरम्यान या स्टोन क्रेशर संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे ( गौण खनिज विभाग) यांनी एक वर्षा पुर्वी मुरबाड तहसील कार्यालयास कारवाईचे आदेश दिले असतानाही राजकीय हितसंबंधांमुळे आज पर्यंत महसूल विभाग सुद्धा कारवाई करण्यास धजावत नसल्याची चर्चा होत आहे.

## आमदार संजय केळकर घेणार अधिकाऱ्यांची झाडाझडती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे :ठाण्यात एकीकडे पाण्याची कमतरता असताना दुसरीकडे नव्याने सुरू असलेल्या बांधकामांसाठी पाण्याची पळवा-पळवी सुरू आहे.पाणीपुरवठा नियोजनाचा बट्ट्याबोळ झाला असून सोमवारी अधिकाऱ्यांची बैठक घेणार असल्याची माहिती आमदार संजय केळकर यांनी दिली.तर वाढत्या बेकायदा बांधकामांचा मुद्दाही येत्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित करून कठोर कारवाईची मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. जनसेवकाचा जनसंवाद या उपक्रमांतर्गत आमदार संजय केळकर यांनी खोपट येथील भाजपा पक्ष कार्यालयात नागरिकांशी संवाद साधत नागरी समस्या ऐकून घेतल्या.पत्रकारांशी बोलताना केळकर यांनी ठाण्यात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत नाराजी व्यक्त केली. ३०-३५ बेकायदा बांधकामांची यादीच प्रशासनाला देण्यात आली असून त्यावर तक्रारदाराचे समाधान करण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. न्यायालयाने कानउघाडणी केल्यावरच कारवाई केली जाते.येत्या अधिवेशनात याबाबत आवाज उठवून अशा बांधकामांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करणार असल्याचे केळकर यांनी सांगितले.

# शहापूर तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्षपदी जितेश विशे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर दि.८ :** शहापूर: शहापूर तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी वेहलोंढे गावचे उपसरपंच जितेश विषय यांची निवड झाली आहे. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महेश धानके हे दीर्घ आजाराने ग्रस्त झाल्यानंतर वीस महिन्यापूर्वी देवेंद्र भेरे यांच्याकडे तालुका अध्यक्ष पदाचा प्रभारी पदभार सोपवला होता. मात्र काँग्रेसला नवीन प्रदेशाध्यक्ष मिळाल्यानंतर तालुकाध्यक्ष व ब्लॉक अध्यक्ष पदासाठी मुलाखती घेण्यात आल्या. महेश धानके यांनी आजारपणातून पूर्ण बरे नसल्याने तालुका अध्यक्ष पद घेण्यास नकार देऊन युवा नेते जितेश विशे यांची शिफारस जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांच्याकडे केली. दयानंद चोरघे यांनी जितेश विशे यांच्यावर विश्वास ठेवून त्यांची शिफारस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे केल्यानंतर जीतेश विशे यांचे काँग्रेस पक्षातील आतापर्यंतचे योगदान लक्षात घेऊन त्यांना तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. जितेश विशे हे उच्चशिक्षित आहेत. सलग तिसऱ्यांदा वेहलोंढे गावचे उपसरपंच झाले असून त्यांनी आपल्या कालावधीमध्ये आदर्श काम करून आपली ग्रामपंचायत राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार घेऊन चमकवली. ते सोलर क्षेत्रातील यशस्वी उद्योजक म्हणून तालुक्याला परिचित आहेत. त्यांनी काँग्रेसच्या ओबीसी विभागात प्रदेश सचिव म्हणून काम पाहिले आहे. शहापूर तालुक्याच्या राजकीय, सामाजिक, व भौगोलिक परिस्थितीची त्यांना चांगली माहिती आहे, प्रशासकीय कामाचा त्यांना चांगला अनुभव आहे. त्यांच्या माध्यमातून काँग्रेस पक्ष अधिक जोमाने वाढेल अशी अपेक्षा प्रदेशाध्यक्ष व जिल्हाध्यक्ष यांनी त्यांच्याकडून केली आहे. त्यांची तालुकाध्यक्ष पदावर नियुक्ती झाल्यानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला असून त्यांच्यावर संपूर्ण तालुक्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. अध्यक्षपदावर निवड झाल्यानंतर जितेश विशे यांनी सांगितले की काँग्रेससाठी खडतर कालावधी असला तरी सर्व काँग्रेस कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्ष वाढवण्यासाठी प्रामाणिक काम करणार आहे. तालुक्यातील सर्व काँग्रेस कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी रणानिती ठरविण्यात येणार आहे. लवकरच नवीन तालुका कार्यकारणी करणार असून सर्वांना सामावून घेऊन एकत्रित काम करण्याचा मानस असल्याचे जितेश विशे यांनी सांगितले.



## मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग आता दहा पदरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावरील प्रवास अधिक वेगवान होईल. आता सहा पदरी असलेला हा महामार्ग दहा पदरी करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पासाठी एकूण १४ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. याआधी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) या महामार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आठ पदरीकरण करण्याचा निर्णय घेत त्यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला होता. आता आठऐवजी थेट दहा पदरीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या दहा दिवसांत यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे.

एमएसआरडीसीने मुंबई- पुणे प्रवास अतिजलद करण्यासाठी ९४.५ किमी लांबीचा मुंबई - पुणे द्रुतगती महामार्ग बांधला. हा महामार्ग २००२ मध्ये पूर्णतः वाहतुकीसाठी खुला झाला आणि मुंबई ते पुणे अंतर केवळ अडीच तासात पार करणे शक्य होऊ लागले. सध्या या महामार्गावरून धावणाऱ्या वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. त्यामुळे सहा पदरी महामार्ग अपुरा पडू लागला आहे.

## उल्हासनगर मनपात प्रतिनियुक्तीवर महिला उपायुक्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** अलीकडच्या काही महिन्यातच प्रतिनियुक्तीवर आलेल्या विशाखा मोटघरे, दिपाली चौगले या दोन महिला अधिकाऱ्यांनी उल्हासनगर महानगरपालिकेत उपायुक्त पदभार स्विकारलेला आहे. आता महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या मान्यतेने प्रतिनियुक्तीवर आणखीन एका महिला उपायुक्तांची एन्ट्री झाली आहे. स्नेहा करपे या उपायुक्त महिला अधिकाऱ्यांचे नाव असून शुक्रवारी त्यांनी पदभार स्विकारला आहे. त्यामुळे पालिकेत आता प्रतिनियुक्तीवरील 4 उपायुक्त झाले आहेत.



स्नेहा करपे ह्या 2016 च्या बॅचच्या अधिकारी असून त्यांची पहिली नियुक्ती भंडारा जिल्ह्यातील मोहाळी ग्रामपंचायत मध्ये अधिकारी म्हणून झाली होती. त्यानंतर त्यांनी नागपूर महानगरपालिकेत सहायक आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सहायक आयुक्त त्यानंतर अमरावती मधील चांदुरबाजार नगरपालिकेत हाताळले आहे. अनंत जवादवार, दिपाली चौगले आणि स्नेहा करपे हे तिन्ही अधिकारी 2016 च्या एकाच बॅचचे आहेत.









## वाचक मनोगत

# दोन्ही राष्ट्रवादी एक होणार?

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवार आणि अजित पवार एकत्र येणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहेत. या चर्चाचं कारण म्हणजे मागील काही दिवसांत अनेकवेळा शरद पवार आणि अजित पवार एकाच व्यासपीठावर आल्याचं पाहायला मिळालं. एवढंच नाही तर त्यांच्यात अनेकदा संवाद झाल्याचंही पाहायला मिळालं. काही दिवसांपूर्वी शरद पवार आणि अजित पवार हे पुण्यातील साखर संकुलातील बैठकीत देखील एकत्र आल्याचं पाहायला मिळालं होतं. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? अशा चर्चांनी आणखी जोर धरला आहे.

यातच आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार अमोल मिटकरी यांनी एक सूचक भाष्य केलं. पांडुरंगाची इच्छा असेल तर बहीण-भाऊ आषाढी एकादशीपर्यंत एकत्र येऊ शकतात, असं अमोल मिटकरी यांनी म्हटलं. त्यानंतर आता खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? यावर मोठं भाष्य केलं आहे. 'हा माझा निर्णय नाही, जो पक्षाचा निर्णय असेल तो निर्णय पक्षाच्या शेवटच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन आणि त्याच्या मनात जे असेल तोच निर्णय पक्ष घेईल, असं सूचक भाष्य सुप्रिया सुळे यांनी केलं.

पक्षाच्या वर्धापनदिनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची नुकतीच एक बैठक झाली. या बैठकीमध्ये एका वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार नाहीत, अशी माहिती इतर नेत्यांना आणि पदाधिकाऱ्यांना दिली असल्याचे सांगितले जात आहे. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी तयारी सुरू करण्याच्या सूचना देखील दिल्या आहेत.

दरम्यान, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीने पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुल येथे मोठ्या ग्रँड आयोजनासह यंदाचा वर्धापनदिन साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम अत्यंत महत्वाचा मानला जात आहे. हा कार्यक्रम केवळ वर्धापनदिन नसून, एक प्रकारचं शक्तिप्रदर्शन असल्याचं बोललं जात आहे. विविध जिल्ह्यांमधून कार्यकर्त्यांची मोठी फौज पुण्यात दाखल होण्याची शक्यता आहे. बालेवाडी येथे होणाऱ्या या कार्यक्रमात अजित पवार स्वतः उपस्थित राहून आगामी राजकीय दिशा स्पष्ट करणार आहेत.

स्वप्नील हरणे

# ठाकरे बंधूंच्या एकत्रीकरणावर प्रश्नचिन्ह

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांचा कार्यक्रम कोणत्याही क्षणी जाहीर होण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. अशातच गेल्या काही वर्षांपासून बहचर्चित उद्धव-राज या ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यासंबंधीच्या हालचालीही चांगल्याच वाढल्याचं दिसून येत आहे. अशातच आता महायुतीतील नेत्यानं केलेल्या विधानामुळे मोठी खळबळ उडाली आहे. आगामी मुंबई महापालिकेसाठी एकीकडे भाजपसह एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेनं जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. तर दुसरीकडे विधानसभेला सपाटून मार खाल्यानंतर उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंच्या मनसेनं आता मुंबई महापालिकेसाठी युतीचे संकेत दिले आहेत. दोन्ही ठाकरे बंधूंचं मनोमिलनाच्या चर्चा सुरू असतानाच आता एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतील ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार गजानन कीर्तीकर यांनी शिवसेना-मनसे एकत्र येण्याबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. दोन्ही बाजूच्या नेत्यांनी यासंदर्भात सूचक वक्तव्य करत एकप्रकारे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि मनसेच्या युतीबाबतचे काहीसे संकेतच दिले आहेत. राज आणि उद्धव ठाकरेंच्या एकत्र येण्यावर राजकीय नेतेमंडळींनीही उलटसुलट प्रतिक्रिया दिल्या आहेत. यापूर्वीही एकनाथ शिंदेंना अडचणीत आणणारी वक्तव्ये करणाऱ्या शिवसेना नेते गजानन कीर्तीकर यांनी आता पुन्हा एकदा नवा बॉम्ब टाकला आहे. कीर्तीकर यांनी उद्धव आणि राज ठाकरे यांनी एकत्र यावं ही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंची इच्छा होती असं म्हटलं आहे. त्यापुढे जात त्यांनी सध्याची एकनाथ शिंदेंची शिवसेना ही भाजपप्रणित बनल्याची खोचक टीका केली आहे. महायुतीतीलच एका ज्येष्ठ नेत्यानं अशी भूमिका घेतल्यानं सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

# ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांचे तरुणांना योगावलंबाचे आवाहन

"ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रोहन घुगे सरांनी तरुणांना चांगल्या भविष्यासाठी योगाचा अवलंब करण्याचे आवाहन केले आहे"

३१ मे रोजी, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रोहन घुगे सर यांनी "बाल योग सत्र" मध्ये भावी पिढ्यांसाठी योगाचे महत्त्व यावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी तरुण मनांना आकार देण्यास आणि त्यांच्या वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी योगाच्या परिवर्तनीय शक्तीवर भर दिला.

**प्रमुख मुद्दे :**

- श्री. घुगे सरांनी मुलांसाठी योगाचे फायदे अधोरेखित केले, ज्यामध्ये शारीरिक आणि मानसिक आरोग्य, एकाग्रता आणि चांगले तणाव व्यवस्थापन यांचा समावेश आहे.

- त्यांनी योगाचा त्यांच्या दैनंदिन जीवनात समावेश केल्यामुळे त्यांना कसे फायदे झाले याबद्दल वैयक्तिक अनुभव सांगितले, त्याचा त्यांच्या एकूण आरोग्य आणि कार्यक्षमतेवर कसा सकारात्मक परिणाम झाला आहे हे उघड केले.

- विशेष उल्लेखनीय म्हणजे, त्यांनी यूपीएससीच्या तयारीतील यशाचे श्रेय योगाला दिले, त्यांची मानसिक स्पष्टता, एकाग्रता आणि समतोल वर्तणूक यासाठी योगाचा कसा उपयोग झाला हे सांगितले.

**कृतज्ञता आणि कौतुक :**

श्री. घुगे सरांनी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांचे योगाद्वारे भारतीय ज्ञान आणि संस्कृतीचा प्रचार केल्याबद्दल, निरोगी भारत आणि विकसित भारतासाठी काम केल्याबद्दल मनापासून आभार मानले. उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र सरकार आणि संबंधित विद्यापीठांनी आयोजित केलेल्या ५० दिवसांच्या योग काउंटडाउन कार्यक्रम २०२५ च्या उपक्रमाचेही त्यांनी कौतुक केले. त्यांनी माननीय मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील आणि माननीय आमदार श्री. किसन कथोरे जी यांचे दूरदर्शी नेतृत्व आणि पाठिंब्याबद्दल विशेषतः आभार मानले. याव्यतिरिक्त, डॉ. विजय कुकरेजा यांच्या तज्ज्ञ



मार्गदर्शनाखाली इतके अद्भुत सत्र आयोजित केल्याबद्दल त्यांनी आरोग्य योग आणि निसर्गोपचार संस्था टीमचे कौतुक केले.

**दूरदर्शी नियोजन :**

श्री. घुगे सरांनी शाळांमध्ये योग लागू करण्याच्या त्यांच्या भविष्यातील योजना देखील सांगितल्या, ज्याचा उद्देश सुमारे २ लाख विद्यार्थ्यांना लाभ देणे आहे हा आहे.

**त्यांची उद्दिष्टे आहेत :**

- शारीरिक आणि मानसिक आरोग्याला चालना देण्यासाठी शालेय अभ्यासक्रमात योगाचा समावेश करणे.

- शिक्षकांना योग सत्रांचे नेतृत्व करण्यासाठी आणि सहाय्यक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण देणे.

- प्रगतीचे निरीक्षण करणे आणि विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त फायदे मिळावेत यासाठी कार्यक्रमात समायोजन करणे.

उज्वल भविष्य :

या उपक्रमाद्वारे, श्री. घुगे सरांचे ध्येय तरुण मनांना यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांसह सक्षम करणे आहे. योग आणि आरोग्याला प्राधान्य देऊन, ते ठाण्यातील विद्यार्थी निरोगी, आनंदी आणि अधिक जागरूक असावेत यासाठी त्यांचे प्रयत्न आहेत.

**चला यासाठी पाठिंबा देऊया :**

"बाल योग सत्राचे" प्रचंड यश म्हणजे मुले आणि पालक दोघांनाही योगाच्या परिवर्तनकारी शक्तीचा फायदा होत आहे.

चला तर मग .... आपण श्री. घुगे सरांच्या दृष्टिकोनाला पाठिंबा देऊया आणि आपल्या मुलांसाठी उज्वल भविष्य घडविण्यासाठी एकत्र काम करूया.

## वरीष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणाकरीता

# ७५ टक्के उपस्थितीचा शासन निर्णय निर्गमित व्हावा

## शिक्षण क्रांती संघटनेची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व कला क्रीडा शिक्षकांच्या त्रिस्तरीय वेतन श्रेणीकरीताचे आवश्यक प्रशिक्षण २ जून ते १२ जून या कालावधीसाठी राज्यभर सुरू आहे. या प्रशिक्षणाला १०० टक्के उपस्थितीचा मनमानी हुकूम राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालकांनी काढला आहे. ज्यामुळे अनेक प्रशिक्षणार्थी या प्रशिक्षणालाच मुकले आहेत तर काही शाळा व्यवस्थापन अभ्यासक्रमाची व एम.ए.ची परीक्षा देऊ शकले नाहीत. १०० टक्के उपस्थितीची सक्ती कोणत्याही अभ्यासक्रमाला किंवा प्रशिक्षणाला नसते, त्याचबरोबर प्रशिक्षणादरम्यान दर तासाला ऑनलाईन हजेरी नोंदवण्याचा तुघलकी किंवा शिक्षकांवर अविश्वास दर्शवणारा नियम एससीईआरटीच्या संचालकांनी घेतलेला आहे. प्रशिक्षणार्थींच्या नातेवाईकांचे अकस्मात निधन झाल्यास, आजारपण उद्भवल्यास, वाहतूक कोंडीत अडकल्यास प्रशिक्षणास वेळेत पोहोचू शकत नाहीत. यादरम्यान शालेय व्यवस्थापन पदविकेच्या ,एमएच्या परीक्षा देखील आहेत या सर्वच बाबी संचालकांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही संचालक १०० टक्के उपस्थितीच्या निर्णयावर ठाम आहेत. कुणाचेही ते ऐकत नसल्याचे समजते. त्यामुळे संचालक (प्रशासन) व शासन यामध्ये वरिष्ठ कोण असा प्रश्न शिक्षक क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर घागस यांनी उपस्थित केला आहे. ठाणे व कल्याण येथील प्रशिक्षण केंद्रांवर जाऊन संघटनेचे कोकण विभाग कार्यवाह ज्ञानेश्वर गोसावी तसेच पदाधिकारी राजेंद्र गवळी, थॉमस शिनगारे, सुरेश साळवे, योगेश वल्लाल,दुर्जन भोईर, गजानन पाटील, अनिल मुरादे, सुधाकर महाजन, संजय माळी, कुणाल झोपे या पदाधिका-यांनी प्रशिक्षणार्थींच्या भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. डॉ. संजय वाघ, प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्यामार्फत एससीईआरटीच्या संचालकांना या समस्यांचे निराकरण करण्याबाबतचे निवेदनही दिले आहे. परंतु मागील अनुभव लक्षात घेता जर संचालकांनी १०० टक्के उपस्थिती बाबतचा निर्णय मागे घेतला नाही तर तातडीने शासनाने ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य असल्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करून प्रशिक्षणापासून वंचित राहणाऱ्यांना व अन्यायकारक निर्णयाची झळ बसलेल्यांना दिल्याचा द्यावा अशी देखील मागणी सुधीर घागस यांनी शिक्षण क्रांती संघटनेच्या वतीने केली आहे.

# कोलंबो (श्रीलंका) येथे बहुशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न




**जे. जे. टी. विद्यापीठ राजस्थान व आय. सी. बी. टी. कॅम्पस कोलंबो, श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सोसायटी ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी अँड ह्युमॅनिटी, कल्याण व जे. वाटुमल साधुबेला गर्ल्स कॉलेज, उल्हासनगर यांच्या सहकार्याने , आय सी बी टी कॅम्पस कोलंबो (श्रीलंका) येथे बहुशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न**

जे. जे. टी. विद्यापीठ राजस्थान व आय. सी. बी. टी. कॅम्पस कोलंबो, श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सोसायटी ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी अँड ह्युमॅनिटी, कल्याण व जे. वाटुमल साधुबेला गर्ल्स कॉलेज, उल्हासनगर यांच्या सहकार्याने दिनांक 23 मे 2024 रोजी घेण्यात आली. बहुशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद , आय सी बी टी कॅम्पस कोलंबो (श्रीलंका) येथे पार पडली. परिषदेची सुरुवात श्रीलंका आणि भारतीय राष्ट्र गीताने तसेच दिप प्रज्वलनाने झाली. परिषद उद्घाटनप्रसंगी डॉ. इंदुरंगा चमेंद्रा, डॉ. अनोका अनासकी दिशानायके, डॉ. अशोक चव्हाण, डॉ. दीनदयाल मुरारका, डॉ. राजेश कुमार, डॉ. वसंत माळी, डॉ. अंजु सिंग, डॉ. कनिका विडांगे, इ. उपस्थित होते. परिषद च्या सुरुवातीला डॉ. अशोक चव्हाण (छ संभाजीनगर), डॉ. नारायण फडके (मुंबई) व डॉ. स्वप्ना समेल (कल्याण) यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय भरीव योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी परिषदेत तीन प्राध्यापकांचे व्याख्यान आयोजित केले होते . ऑनलाइन व ऑफलाइन माध्यमातून 83 हून अधिक शोधकर्त्यांनी आपल्या संशोधन कार्याचे मौखिक सादरीकरण सादर केले. परिषदेचे प्रसारण फेसबुक लाईव होते तसेच श्रीलंका येथील टी वी वाहीण्या वर प्रसारीत करण्यात आले होते. युवा संशोधकांना प्रोत्साहित करण्यासाठी डॉ. अशोक चव्हाण रिसर्च फाउंडेशन व सोसायटी ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी अँड ह्युमॅनिटी यांच्या वतीने विविध पारितोषिकांचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात श्री. वैभव मिसाळ यांनी सर्वोत्कृष्ट मौखिक सादरीकरण, श्री. अजय झिंजाडे यांनी युवा संशोधक तर डॉ. राणी भगत यांनी नाविन्यपूर्ण संशोधन ही पारितोषिके पटकावली. परिषदे नंतर वेगवेगळ्या ठीकाणी भेट देऊन अभ्यास केला कॅन्डी येथील पेरीडोनीया बोटॅनिकल गार्डन ला भेट देऊन तेथील विविध वनस्पतीचा अभ्यास केला, पिनावाला हत्ती संगोपन केन्द्रला भेट दिली, तसेच बेन्टोटा येथील कासव संगोपन केन्द्रला भेट देऊन प्लास्टिक चा कासवांच्या जिवावर काय परीणाम होतो जेली फीश समजून प्लास्टिक गिळंकृत करतात नंतर कासव खोल पाण्यात जाऊ शकत नाहीत. औषधी वनस्पतींच्या आणि स्पाईस गार्डन भेट देऊन प्रत्यक्ष वनस्पती बघुन ऊपयोग समजून घेतले एतीहासीक स्थळांना भेटी दील्या सिगेरिया राक , द्वबोला केव, गोल्डन टेम्पल, दंबुला, अशोक वाटीकेला भेट दिल्यानंतर रामायणातील आठवणी ताज्या झाल्या चहाच्या च्या कंपनीला भेट देऊन प्रत्यक्ष चहा पावडर कसी केली जाते याचा अभ्यास केला. परिषद यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता परिषदेचे संयोजक प्राचार्य डॉ वसंत माळी, जे वाटुमल साधुबेला महिला महाविद्यालय संयोजिका डॉ अंजू सिंग यांनी विशेष प्रयत्न केले. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष उत्तमसिंग पवार, सचिव नितीन बागवे, प्राचार्य एम एस कुऱ्हाडे , प्राचार्य नारायण फडके , प्राचार्य युवराज महाजन , प्रा. हीनल वाधवा, प्रा. राजेश कुमार सिंग, डॉ दत्तात्रय काळबांडे, प्रा. शर्मिला कर्वे, अर्चना वर्मा , पुणम, सहीता नानकी , माला अंभोरे, यांनी अभिनंदन केले. या अगोदर पण प्राचार्य डॉ वसंत पंडीत माळी यांनी विविध देशात आंतरराष्ट्रीय परिषद चे आयोजन केलेले आहे.

# शहापूरमधील उबाठाच्या सातशे कार्यकर्त्यांच्या हाती शिवधनुष्य



## उच्चशिक्षित तरुण राजकारणात येणं ही काळाची गरज

**धनुष्यबाण हाती घेणाऱ्या भानुदास मुरकुटे यांचा नातू नीरज मुरकुटे याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी विशेष कौतुक केले. नीरज मुरकुटे हा ऑस्ट्रेलियातील सिडनी विद्यापीठातून उच्च शिक्षण घेऊन आला आहे. त्याने शिवसेनेत काम करण्याची इच्छा व्यक्त केली. समाजाच्या दृष्टीने उच्चशिक्षित पिढी राजकारणात येणं, ही काळाजी गरज आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. यानिमित्ताने उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, शिवसेनेचे युवा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे देखील नुकताच चार देशांचा दौरा करुन मायदेशी परतले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ. श्रीकांत यांनी खासदारांच्या शिष्टमंडळाचे यशस्वी नेतृत्व केलं आणि परदेशात ऑपरेशन सिंदूरबाबत भारताची भूमिका पटवून दिली. या चारही देशांनी भारताला पाठिंबा दिला आणि पाकिस्तानला विरोध केला. पाकिस्तानचा खरा चेहरा उघडा करण्याचे काम या शिष्टमंडळाने केले, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

एखाद्याला शब्द दिला तर तो पूर्ण करतो, हे मुख्यमंत्री असताना मागील अडीच वर्षात महाराष्ट्रातील जनतेने पाहिलं आणि अनुभवलं. पूर्वीचे स्थगिती सरकार होते तर महायुतीचे प्रगतीचे आणि समृद्धीचे सरकार आहे, असा टोला शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठाला लगावला. माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्यासह अहिल्यानगरमधील श्रीरामपूरच्या शेकडो कार्यकर्त्यांनी तसेच ठाणे जिल्ह्यातील शहपूरमधील सुमारे ७०० कार्यकर्त्यांनी आज उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्यात उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी शिवसेना सचिव राम रेपाळे, सचिव संजय मोरे, शिवसेना प्रवक्ते राहुल लोंढे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांचे विचार पुढे घेऊन चाललोय. मुख्यमंत्री असताना राज्यात लाडकी बहिण, लाडका भाऊ, लाडक्या शेतकऱ्यांसाठी व ज्येष्ठांसाठी कल्याणकारी योजना आणल्या. त्यामुळेच महायुतीला विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक बहुमत मिळाले. आताही महायुतीची दुसरी इनिंग सुरु आहे, देवेंद्रजी आणि आमची टीम महाराष्ट्राला पुढे नेतेय. या राज्याचा विकास, प्रगती झाली पाहिजे आणि सर्वसामान्य माणूस विकासाच्या मुख्य प्रवाहात आला पाहिजे, या हेतूने सरकार काम करत आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. माजी आमदार भानुदास मुरकुटे, नीरज मुरकुटे, संजय छल्लारे, सिद्धांत छल्लारे, लक्ष्मण कुमावत, भगवान उपाध्ये, शेखर दुब्बैया, तेजस बोरावके, रोहित नाईक, संजय साळवे, संजय परदेशी, महेंद्र टाटिया यांच्यासह श्रीरामपूर विधानसभा मतदार संघातील शेकडो सहकारी, अनेक माजी पंचायत समिती सदस्य, माजी जिप सदस्य, सरपंच, उपसरपंच तसेच शेकडो सामाजिक कार्यकर्ते, विदर्भ शिक्षक संघटनेचे डॉ. दिलीप सूर्यवंशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी आज उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेना ठाणे ग्रामीण जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे आणि प्रकाश पाटील यांच्या नेतृत्वात शहापूर तालुक्यातील उबाठा गटाच्या जवळपास ७०० कार्यकर्त्यांनी आज धनुष्यबाण हाती घेतला. तसेच लातूरमधील महिला भगिनींनी आज उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

# बऱ्याच काळानंतर रंगभूमीवर कोर्टरूम ड्रामा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मराठी रंगभूमीवर बराच काळ कोर्टरूम ड्रामा आलेला नाही. फार वर्षांपूर्वीचा आचार्य अत्रे लिखित तो मी नव्हेच हा नटवर्य प्रभाकर पणशीकर यांनी गाजवलेला कोर्टरूम ड्रामा आजही रसिकांच्या स्मरणात ताजा आहे. पण त्यानंतर असा प्रभावी कोर्टरूम ड्रामा अद्यापि मंचित झालेला नाही. आता पुनश्च सबकुछ पुरुषोत्तम बेर्डे संकल्पित, दिग्दर्शित, नेपथ्यित, संगीत, वेशभूषेसह अनेक जबाबदाऱ्या पेललेलं गंगा यमुना सरस्वती हा राजन मोहाडीकर लिखित कोर्टरूम ड्रामा रंगमंचावर आलेला आहे. अर्थात त्याची मांडणी तशी जुनीच आहे. तो मी नव्हेचला समांतर जाणारं कथानकच यात आहे.








सोमवार
०९ जून २०२५

**मेष**
आर्थिक बाबतीतमित्राकडून सल्ला मिळेल, ज्याचा तुम्हाला खूप फायदा होईल. प्रसन्नता वाटेल.

**वृषभ**
तुमच्या सर्व समस्या क्षणार्धात दूर होतील. सरकारी कामात तुम्हाला मोठा फायदा होण्याची शक्यता .

**मिथुन**
आज तुम्ही तुमच्या मुलांसोबत सहलीला जाऊ शकता. मुलांसमवेत चांगला वेळ घालवाल.

**कर्क**
तुम्ही एखाद्या तज्ञाचा सल्ला घ्याल, हा सल्ला उपयुक्त ठरेल. आज महिलांसाठी दिवस अनुकूल

**सिंह**
दिवस तुमच्यासाठी चांगला परिणाम देईल. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या**
अभ्यासात अधिक मेहनत करावी लागेल. कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल

**तूळ**
कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. ऑफिसमधील सहकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**वृश्चिक**
आज तुमचा दिवस चांगला जाईल. आधीच अस्तित्वात असलेल्या समस्यांचे समाधान मिळेल

**धनु**
मन प्रसन्न राहील. कुटुंबात धार्मिक कार्याचे नियोजन करता येईल. काही चांगले करण्याचा प्रयत्न कराल.

**मकर**
दीर्घकाळ निरोगी राहण्यासाठी तुम्ही चांगला आहार घ्यावा. विचाराने समस्या सोडवाल.

**कुम्भ**
दिवस तुमच्यासाठी उत्तम राहील. मोठे निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला आहे. कर्ज घेऊ नका

**मीन**
वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्याना आज खूपच मेहनत करावी लागेल. वरिष्ठांचे मार्गदर्शन लाभेल.

# वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणार्थींच्या समस्या शासन दरबारी मांडणार - आ. निरंजन डावखरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : प्रतिनिधी** राज्यात 02जून 2026 पासून वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले असून सदर प्रशिक्षणामध्ये अनेक समस्या निर्माण झाल्याच्या तक्रारी आमच्यापर्यंत आल्या आहेत.सदर समस्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार निरंजन डावखरे यांनी एम एच हायस्कूल ठाणे येथे सुरू असलेल्या वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणास भेट देऊन प्रशिक्षणार्थी, सुलभक व केंद्र समन्वयक यांच्याशी संवाद साधून समस्या समजून घेतल्या. तसेच प्रशिक्षणार्थींच्या सर्व समस्या शासन दरबारी मांडल्या जातील व त्या समस्यांवरती निराकरण केले जाईल असे आश्वासन आमदार निरंजन डावखरे यांनी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधताना केले.



प्रशिक्षणादरम्यान टेस्ट लिंक ओपन न होणे, भाषानिहाय अभ्यास पुस्तिका मिळावी, कला क्रीडा शिक्षक हे संपूर्ण प्रशिक्षणावर परीक्षा देणार आहेत म्हणून इतरांनाही देण्यात आलेले अभ्यासपुस्तक हे कला क्रीडा शिक्षकांनाही देण्यात यावे, प्रशिक्षणाचा कालावधी हा जास्त ठेवण्यात आलेला आहे, अनेक शिक्षक प्रशिक्षणास पहिल्या दिवसापासून वेळेवर उपस्थित असून पहिल्या हजेरी पत्रक यादीत त्यांचे नाव आले होते. परंतू नंतरच्या याद्यांमध्ये त्यांची नावे येत नाहीत. तसेच व्हायरल इन्फेक्शनमुळे अचानक आजारी पडलेले शिक्षक, घरात आलेल्या अचानक वैद्यकीय समस्येमध्ये व्यस्त शिक्षक यांची एकदिवसाची उपस्थिती संदर्भात या शिक्षकाला अडचण येऊ नये यासाठी १००% उपस्थितीच्या नियमात शिथिलता द्यावी. प्रशिक्षणासाठी दोन हजार रुपये मूल्य आकारले असून आवश्यक सुविधा, सुयोग्य बैठक व्यवस्था, भोजन, चहा याचे कोणतेही नियोजन नाही. या प्रशिक्षणार्थींच्या अशा विविध समस्ये संदर्भात कोकण पदवीधर आमदार निरंजनजी डावखरे यांनी संवाद साधून प्रशिक्षणार्थींना धीर दिला आहे. संचालक राहूल रेखावर यांच्याशी तत्काळ मोबाईल वरून समस्ये संदर्भात चर्चा केली. तसेच जनरल एज्युकेशन सोसायटी, एम एच हायस्कूल आणि ज्यु. कॉलेज यांनी शिक्षकांना प्राथमिक सुविधा पुरवल्या बद्दल संस्थेचे आभार मानले.

यावेळी भाजपा शिक्षक आघाडी कोकण विभाग सहसंयोजक विनोद शेलकर, , जनरल एज्युकेशन संस्था,संचालक राजेद्रसिंग राजपूत, वरिष्ठ आधीविख्यता डॉ. भगवान खारके, डॉ. प्रभा खरटमोल, अधिविख्याता, विश्वनाथ बिरारी, क्रीडा शिक्षक, संतोष कदम, क्रीडा शिक्षक, सुलभक विनायक पाटील, अर्जुन चेमटे, सुनिल जाधव सह शिक्षक उपस्थित होते.


महाराष्ट्र शासन

आधारसामग्री, संकलन व नियोजन व जलविज्ञान मंडळ, नाशिक अंतर्गत,
कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, कळवा - (ठाणे)

सहकार विद्यालय समोर, जुना मुंबई-पुणे महामार्ग, कळवा (ठाणे) ४००६०५
ई-मेल :- eehpthn@rediffmail.com दूरध्वनी क्रमांक ०२२-२५४२६०६३

(Recall-1) ई-निविदा सुचना क्र ०१ सन २०२५-२०२६
Main Portal: http://mahatenders.gov.in

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत . सविस्तर निविदा सूचना व ई निविदबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलका वर उपलब्ध आहे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविणेत येईल.

| | | |
|---|---|---|
| कामाचे नांव | :- | Real Time Data acquisition System (RTDAS-3) For West Ward Flowing Rivers Basins in Konkan Region to Control Flood |
| जिल्हा | :- | ठाणे |
| निविदेची अंदाजित किंमत | :- | रु. 2,80,32,000/- |
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक- ०९/०६/२०२५ ते दिनांक १६/०६/२०२५ |
| ई-निविदा उघडणे :- दिनांक | :- | १७/०६/२०२५ वेळ १७.०० वा. |
| स्थळ | :- | कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) यांचे कार्यालय |

संकेतस्थळावर प्रसिध्द होणा-या निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीने संबंधित कार्यालयात उपस्थित रहावे अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही

जावक क्रमांक : जविप्रविक / लेशा -२/७४९/२०२५
कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प
विभाग, कळवा (ठाणे) यांचे कार्यालय,
दिनांक : २८/०५/२०२५

सही/-
श्रीमती प्रा. सं. पाटील
कार्यकारी अभियंता,
जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे)


# कल्याणच्या प्रवेशद्वारावर भव्य तिरंगा उभारण्याची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण हे ऐतिहासीक शहर असून कल्याण पश्चिम दुर्गाडी किल्ला जवळ कल्याणच्या प्रवेशद्वारावर पाणबुडी व T-80 युद्ध नौका आणून या शहराचे भुषण वाढविण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी मोठा राष्ट्रीय ध्वन (तिरंगा) नाविण्यपूर्ण उभारण्याची मागणी शिवसेना उपशहर प्रमुख तथा माजी नगरसेवक मोहन उगले यांनी केडीएमसी आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

कल्याण पश्चिम शहरामध्ये आगमन करतांना दोन ऐतिहासिक ठेवा या शहरामध्ये लावण्यात आलेले असून एक गोष्टीची कमतरता भासून येत आहे. ती म्हणजे दोन्ही वास्तूच्या समोर आपल्या देशाचा तिरंगा मोठ्या डौलाने फडकेल अश्या ठिकाणी लावण्यात यावा अशी कल्याणातील जाणकार लोकांचे मत असून त्यास आमची सुध्दा पसंती आहे. त्या अनुषंगाने शहराचा मान सन्मान वाढेल अशी धारणा शहरातील ज्येष्ठ नागरीकांची आहे. त्यामुळे या सर्व गोष्टीचा आदरपूर्वक विचार करून ठाणे, डोंबिवली, अंबरनाथ या शहरात उभारण्यात आलेल्या भव्य तिरंगा झेंड्या प्रमाणे झेंडा लावण्यासाठी योग्य निर्णय घेण्याची मागणी मोहन उगले यांनी केडीएमसी आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

# डोंबिवलीत निळ्या रंगाच्या पावसाने आश्चर्य



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** डोंबिवली आज पाऊस सुरू झाला या पावसानंतर एमआयडीसी निवासी परिसरात ठीक ठिकाणी निळ्या रंगाचे पाणी पसरले होते. एमआयडीसी परिसरात रासायनिक कंपन्या आहेत. सागर्ली परिसरातील आईस फॅक्टरी जवळ पावसाच्या पाण्याचा रंग निळा झाला. आतापर्यंत डोंबिवलीमध्ये गुलाबी पाऊस त्यानंतर हिरवा पाऊस झाला होता आज निळ्या रंगाच्या पावसामुळे प्रदूषणाच्या प्रश्न एकदा परत ऐरणीवर आला आहे. मात्र हे जलप्रदूषण असून प्रदूषण नियंत्रण मंडळाचे यावर नियंत्रण नाही असा आरोप करीत उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी जर प्रदूषण मंडळांनी लक्ष दिले नाही तर उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष तीव्र आंदोलन करणार आंदोलन अशा इशारा दिला आहे.

# शिवसेना कल्याण जिल्हा समन्वयक पदी हर्षवर्धन पालंडे यांची नियुक्ती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील शिवाजी कॉलनी प्रभागाचे माजी नगरसेवक आणि उबाठा गटाचे माजी उपजिल्हा प्रमुख हर्षवर्धन पालंडे यांची शिवसेना कल्याण जिल्हा समन्वयक या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे . पक्षाचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे यांनी ही नियुक्ती केली आहे. या नियुक्तीचे पत्र कल्याण लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते हर्षवर्धन पालंडे यांना प्रदान करण्यात आले.



ऐन विधानसभा निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख हर्षवर्धन पालंडे यांनी डोंबिवलीत तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या एका निवडणूक प्रचार सभेत हर्षवर्धन पालंडे यांनी अनेक कार्यकर्त्यांसह उबाठा गटाला सोडचिठ्ठी देत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटात जाहीर प्रवेश केला होता. प्रदिर्घ कालखंडानंतर हर्षवर्धन पालंडे यांची अखेर शिवसेना कल्याण जिल्हा सन्मवयक या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

आक्टोबर २०२४ मध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणूकीत हर्षवर्धन पालंडे हे कल्याण पूर्व विधानसभा मतदार संघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक होते. त्या प्रमाणे त्यांनी मागिल ५ वर्षे संपूर्ण विधानसभा मतदार संघात तयारीही केली होती. या मतदार संघात कल्याण पूर्वेतून ते स्वःता आणि माजी महापौर रमेश जाधव निवडणूक लढविण्यास इच्छुक होते. परंतु पक्ष नेतृत्वाने ऐन वेळी कल्याण पूर्वेच्या बाहेरील इच्छुक धनंजय बोडारे यांना उमेदवारी दिल्यामुळे त्यांनी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षाला सोडचिट्ठी देवून त्यांनी शिंदेच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला होता.

शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केल्यानंतर तब्बल ९ महिन्यांच्या कालखंडात हर्षवर्धन पालंडे यांच्याकडे कोणतेही पद देण्यात आले नव्हते. अखेर शिवसेना कल्याण जिल्हा क्षेत्रात कल्याण जिल्हा समन्वयक पदावर हर्षवर्धन पालंडे यांची पक्ष नेतृत्वाचे नियुक्ती केली आहे. हर्षवर्धन पालंडे यांच्या या नियुक्तीचे त्यांचे सर्व क्षेत्रातून स्वागत होत आहे. पालांडे यांनी सर्व वरिष्ठांचे आभार व्यक्त करत, दिलेल्या जबाबदारीचे तंतोतंत पालन करून जनसेवा कायम कार्यरत ठेवून लोकांचे प्रश्न सोडविण्याचा पुरेपूर प्रयत्न करिन अशी प्रतिक्रिया दिली.

# नवीमुंबईत समाविष्ट १४ गावांना निधी द्या
## मनसे नेते राजू पाटील यांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**डोंबिवली :** कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील १४ गावांचा नवी मुंबई महापालिकेत समावेश करण्यात आला आहे. मात्र नवी मुंबई महापालिकेने अद्याप या गावांचे दप्तर हाती घेतलेले नसल्याने १४ गावांचे घोंगडे भिजत पडले आहे.

विकास निधी अभावी गावांचा विकास रखडला असल्याचे बोलले जात आहे. यावर आता मनसेचे नेते राजू पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देत नवी मुंबई महानगरपालिकेत नव्याने समाविष्ठ केलेल्या गावांत मुलभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी केली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेतून वगळलेली १४ गावे पुन्हा नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट करावी यासाठी तात्कालीन आमदार राजू पाटील व १४ गाव सर्व पक्षिय विकास समितीच्या वतीने लढा देण्यात आला होता. माजी आमदार पाटील यांनी अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करता तात्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली. लोकसभा निवडणूकीच्या आधी १४ गावांचा नवी मुंबईत समाविष्ट करण्याविषयी राज्य शासनाने जीआर काढला.

मात्र अद्याप शासनाच्या या जीआरची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. पालिकेने या गावांचे दप्तर जमा केलेले नसून गावांचा समावेश रखडला आहे. गावांच्या विकासासाठी अतिरिक्त निधीची मागणी करण्यात येत आहे. वनमंत्री गणेश नाईक यांनी येथील बेकायदा बांधकामे व निधीची कमतरता असल्याने ही गावे नवी मुंबईत समाविष्ट करु नयेत अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती.

# कल्याण न्यायालयातून फरार आरोपीला अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** पोक्सो गुन्ह्यात टिटवाळा पोलिसाकडून अटक असलेल्या आरोपीला कल्याण न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाच्या आदेशानुसार त्याला आधारवाडी कारागृहात नेण्यासाठी वाहनात बसवत असताना दोन पोलिसांच्या हातावर तुरी देत पसार झाला. चैतन्य शिंदे असे या आरोपीचे नाव आहे.आरोपी कैदेतून पळताच पोलिसांची भंबेरी उडाली. कल्याण रेल्वे स्थानकाच्या दिशेने त्याने पलायन केल्याने रेल्वे स्थानकातील सीसीटीव्ही मध्ये तो मुंबईकडे जाणाऱ्या लोकलने गेल्याचे पाहताच त्यादृष्टीने तपास करत पोलिसांनी त्याच्या मागे रोहा स्थानक गाठत रोहा परिसरातून त्याला आठ तासात अटक केली. आरोपी चैतन्य शिंदे याच्या विरोधात टिटवाळा पोलीस ठाण्यात बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयाने ठोठावलेली पोलिस कोठडीची मुदत संपल्याने टिटवाळा पोलिसांनी शुक्रवारी कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात त्याला हजर केले असता न्यायालयाने त्याला २० जूनपर्यंत न्यायलयीन कोठडी सुनावली. न्यायालयाच्या आदेशानुसार त्याला आधारवाडी कारागृहात नेण्यासाठी पोलिसांनी कोर्टाच्या आवारातच वाहनात बसवण्याची तयारी सुरू केली. याच वेळी पोलिस त्याला बेड्या घालण्याचा प्रयत्न करत असताना चैतन्यने अचानक दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांना झटका देत गर्दीचा फायदा घेत कल्याण रेल्वे स्थानकाच्या दिशेने धूम ठोकली. कल्याण रेल्वे स्टेशन परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक बाबींचा तपास करत पोलिसांनी चैतन्यचा शोध घेत रायगड जिल्ह्यातील रोहा गाठले. चैतन्य रायगड येथील रोहा येथे लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ सापळा रचत रोहा येथून चैतन्य शिंदेला अवघ्या आठ तासात पुन्हा अटक केल्यानंतर टिटवाळा पोलिसांनी सुटकेचा निश्वास सोडला.

# आज बदलापुरात पाणी नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** बदलापूर पश्चिम भागात सोमवारी मुख्य जलवाहिनीवर तातडीचे देखभाल दुरुस्तीचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून हाती घेतले जाणार आहे. त्यामुळे बदलापूर पश्चिम भागात सोमवारी सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत १२ तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे. पाणी जपून वापरण्याचे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आले आहे.

बदलापूर शहरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे. उल्हास नदीवर असलेल्या बॅरेज बंधाऱ्यातून पाणी उचलून उचलून शुद्धीकरण केले जाते. त्यानंतर ते बदलापूर, अंबरनाथ शहराला पुरवले जाते. अंबरनाथ शहराचे इतरही जलस्त्रोत असले तरी बदलापूर शहराचे फक्त उल्हास नदी हाच एक जलस्त्रोत आहे.

बॅरेज बंधाऱ्यातून विविध जलवाहिन्यांच्या माध्यमातून शहरात पाणी पुरवठा केला जातो. यातील पश्चिम येथील मुख्य जलवाहिनीवर सोमवार, ९ जून रोजी तातडीचे देखभाल दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने याबाबत नागरिकांना जाहीर आवाहन केले आहे. सोमवारी सकाळी ८ वाजल्यापासून रात्री ८ वाजेपर्यंत मुख्य जलवाहिनीवर काम केले जाणार आहे. या १२ तासांच्या काळात बदलापूर पश्चिमेतील पाणी पुरवठा बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे पश्चिमेत या काळात पाणी नसेल. त्यामुळे नागरिकांनी पाणी साठवून ठेवत जपून वापरण्याचे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे पुढील दोन दिवस होणारा पाणी पुरवठा अनियमित आणि कमी दाबाने राहिल, अशीही माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने देण्यात आली आहे.






# जिल्हा परिषद शाळा हस्तांतरणासाठी
# वसई विरार मनपा अजूनही वेटिंगलिस्ट वर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** वसई विरार शहरात महापालिकेची एकही शाळा नसल्याने आता पालिकेच्या अखत्यारीत येत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांचे हस्तांतरण करून विकसित करण्याचा निर्णय पालिकेने घेतला होता. मात्र ती प्रक्रिया ही आता थंडावली असल्याने शाळा हस्तांतरण होण्यास आणखीन विलंब लागणार आहे.

वसई-विरार महापालिकेची स्थापना होण्यापूर्वी ग्रामपंचायती होत्या. त्यामुळे जिल्हा परिषदेमार्फत शाळा चालविल्या जात होत्या. ग्रामपंचायतीच्या नगपरिषदा आणि नगरपरिषदांच्या नंतर महापालिका स्थापन झाली. मात्र महापालिका स्थापन झाल्यापासून वसई विरार शहरात पालिकेने स्वतःच्या मालकीची शहरात एकही शाळा उभारली नाही.

वसई विरार शहरात पालिकेकडून शाळा उभारणी करण्यात यावी अशी मागणी सातत्याने नागरिक करीत असतात. परंतु जागेची अडचण, शिक्षण मंडळ अशा अडचणीमुळे शाळांची उभारणी झाली नाही. वसई विरार शहरात जिल्हा परिषदेने दोनशेहून अधिक शाळा उभारल्या होत्या. विशेषतः गोर गरीब व ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने या शाळा अत्यंत महत्वाच्या आहेत. सद्यस्थितीत केवळ १९२ शाळा उरल्या आहेत. यातील पालिकेच्या कार्यक्षेत्रात ११६ शाळा येत आहेत.

मागील काही वर्षांपासून जिल्हा परिषदेच्या शाळांकडे शासनाने लक्ष न दिल्याने अनेक भागातील शाळांची अवस्था फारच बिकट बनली आहे. अनेक शाळांच्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. या शाळांमध्ये साधनसामुग्री नाहीत. अनेक शाळांमध्ये पुरसे शिक्षकही नाहीत.

प्राथमिक अभाव असल्याने त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत असतो. धोकादायक इमारतींमुळे विद्यार्थी आणि शिक्षकांना सतत भीतीच्या वातावरणात शिकवावे लागते. त्यामुळे या शाळा महापालिकेकडे हस्तांतरित कराव्यात अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. या मागणीनंतर मागील तीन ते चार वर्षांपासून त्या शाळा हस्तांतरण करून पालिकेकडून त्या विकसित करण्याची तयारी दर्शवली जात होती. मात्र सद्यस्थितीत हस्तांतरण करण्याची प्रक्रिया थंडावली असल्याने अजूनही यातून मार्ग निघाला नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
ठाणे ■ सोमवार ■ ०९ जून २०२५
jeevandeepvartanews2020@gmail.com



# पेण येथे तालुकास्तरीय वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण सुरू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल आणि पेण पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी तालुकास्तरीय प्रशिक्षण पेण प्रायव्हेट हायस्कूल येथे पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत आहे. ज्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे बारा वर्षे पूर्ण होतात अशा शिक्षकांसाठी वरिष्ठ श्रेणी तर 24 वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षकांसाठी निवड श्रेणीचे प्रशिक्षण २ जून ते १२ जून या कालावधीत पेण पंचायत समिती समन्वयक निलेश मानकवळे यांच्या सहकार्याने चालू असून या प्रशिक्षणासाठी निवड श्रेणीकरिता४३ प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत असून यासाठी सुलभक राकेश आहिरे, विलास पाटील,राजेंद्र पाटील ,प्रवीण मगर असून वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी ४७ प्रशिक्षणार्थी असून त्यांना मार्गदर्शक म्हणून फरीद शिरगांवकर, सौ अंजली जोशी,संदेश मोरे सौ. प्रगती भगत हे उत्तम प्रकारे काम करत असून प्रशिक्षणार्थी आनंदाने प्रशिक्षण घेत आहेत अशी माहिती निलेश मानकवळे यांनी दिली.



## पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांच्या नोंदणीसाठी शासनाकडून पोर्टल

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** वय वर्ष ३ ते ६ या वयोगटातील बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणारे खाजगी केंद्र, Pre. school, Nursery, Jr.K.G., Sr. K.G. पूर्व प्राथमिक वर्ग अशा कोणत्याही नावाने सुरु असलेल्या वयोगट ३ ते ६ मधील बालकांना शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची नोंदणी करण्यासाठी Pre. School Portal पोर्टल शासनाकडून सुरु करण्यात आले आहे.

पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांच्या नोंदणीची सुविधा Education Maharashtra.gov.in या संकेतस्थळावर web links Pre. School Portal (ECCE) या टॅबवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामध्ये ३ ते ६ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची माहिती, व्यवस्थापनाची माहिती, विद्यार्थी संख्या, भौतिक सुविधा, कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नोंद पोर्टलवर करावयाची आहे. व पुढील कागदपत्रे अपलोड करायची आहेत.

१. शिक्षकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेबाबत गुणपत्रक/प्रमाणपत्र

२. इमारत पूर्णत्वाचा दाखला

३. आरोग्य स्वच्छता प्रमाणपत्र

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रशासन अधिकारी यांच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या खाजगी पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या केंद्रांनी नोंदणी करुन घेण्यात यावी. खाजगी पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या केंद्रांना नोंदणीसाठी येणाऱ्या अडचणीचे निराकरण करणेसाठी प्रभाग समिती निहाय समिती स्थापन करण्यात आली आहे. तरी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रशासन अधिकारी यांच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या खाजगी पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या केंद्रांनी नोंदणी करुन घेण्यात यावी. नोंदणीसाठी येणाऱ्या अडचणीचे बाबत प्रभाग समिती निहाय गठित समितीकडे संपर्क साधावा. असे आवाहन भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त (शिक्षण) बाळकृष्ण क्षिरसागर यांनी केले आहे.

## बालेवाडीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वर्धापन दिनाचे आयोजन

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा वर्धापन दिन येत्या १०जुन रोजी पुणे येथील बालेवाडी येथे आयोजित केला असुन यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ठाणे जिल्हातील जिल्हा,तालुका पदाधिकारी,कार्यकतें यांची पक्ष कार्यालय वरप (कल्याण)येथे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रमोदजी हिंदुराव यांच्या मार्गदर्शनां खाली बैठक संपन्न झाली यावेळी पुणे येथील कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी बसेसची सुविदा पुरविण्यात येणार असुन त्याच योग्य असे नियोजन जिल्हा व तालुका अध्यक्ष यांनी कराव. तसेच मोठया संख्येने कार्यकतें उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी यासाठी मार्गदर्शन केलेया समयी प्रदेश सरचिटणीस किसनराव तारमले, डी के विशे(सर) मायाताई कटारिया,रमेशजी हनुमंते,जिल्हा अध्यक्ष भरतजी गोंधळे, महिला अध्यक्ष कल्पना तारमले, जिल्हा युवक अध्यक्ष प्रतीक हिंदुराव, तालुका अध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते

## सफाळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन संपन्न

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

ऋषीकेश जाधव

पालघर प्रतिनिधी सफाळे /औद्योगिक प्रशिक्षण संस्था सफाळे ता जि पालघर येथील संस्थेत "शिवराज्याभिषेक दिन सोहळा" मान्यवर व या कार्यक्रमाचे अध्यक्ष पुरूषोत्तम करंडे, अध्यक्ष पांडुरंग वामन अमृते शिक्षण संस्था सफाळे. संजीव म्हात्रे - अध्यक्ष, सेतू को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी स्थानिक शाखा तथा माजी प्राचार्य - लोकनायक जयप्रकाश नारायण विद्यालय आगरवाडी. एच. लोखंडे पत्रकार सफाळे, नितीन वर्तक - प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था ( I T I ) सफाळे, यांच्या हस्ते महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व मान्यवर यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य नितीन वर्तक यांच्या हस्ते मान्यवर यांना सन्मानित करीत कार्यक्रमांची सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष पुरुषोत्तम करंडे सर यांनी छत्रपती शिवाजी महाराज कधीही जातीय भेदभाव मानले नाही. त्यांच्या सैन्यदलातील सर्वधर्मीय बांधव होते. त्यांना शिवरायांचे मावळे म्हणून संबोधले जात असे. सैन्य दलात अनेक महत्त्वाची पदावर मुस्लिम बांधव विराजमान होते, असे सांगत महाराजांच्या आठवणींना उजाळा दिला. संजीव म्हात्रे सर यांनी शिवाजी महाराजांनी केलेल्या गनिमी कावा पध्दतीने केलेली लढाई आणि काळातील सैन्यदलातील लढाईत अनेक बदल झाले आहे. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी लढाई साठी वापरण्यात येणाऱ्या पध्दतीचा,विचारांचा आजही युध्दात वापर करण्यात येत आहे, सांगत महाराजांच्या आठवणींना उजाळा दिला. एच लोखंडे पत्रकार आणि संस्थेचे प्राचार्य नितीन वर्तक यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनपटावरील मार्गदर्शन पर आपापले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाची रूपरेषा व सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन कार्याचे कार्य पंकज म्हात्रे सर यांनी कौशल्य पुर्ण पध्दतीने साभाळले. कार्यक्रमाला संस्थेचे निदेशक किरण बारी , संजय गहला, भागेश पाटील , गणेश घरत, दिशा पाटील अल्पिता वझे , वैशाली पाटील आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षण घेत असलेले विद्यार्थी गण उपस्थित होते.

## रायगड जिल्ह्यात उद्यापासून २३ जून पर्यंत जमावबंदीचे आदेश

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**पेण :** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड यांनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दि. ९ जून २०२५ रोजी ००.०१ वाजल्यापासून ते २३ जून २०२५ रोजी २४.०० वाजेपर्यंत जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रात जमावबंदी आदेश लागू केले आहेत. ९ जून २०२५ रोजी किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५२ वा शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या प्रमाणावर साजरा होणार असून लाखो शिवभक्तांची उपस्थिती अपेक्षित आहे.दि. १७ व २० जून २०२५ रोजी राजमाता जिजाऊ स्मृतीदिन साजरे होणार आहेत.या कालावधीत५ पेक्षा जास्त व्यक्तींचा जमाव किंवा मिरवणूक पूर्वपरवानगीशिवाय घेणे यावर बंदी असेल.या कालावधीत वगळण्यात आलेल्या बाबी, शासकीय अधिकारी, ड्युटीवरी असताना अधिकृत शस्त्र वापरू शकतील.अंत्यविधी, प्रेतयात्रा, किंवा शासकीय समारंभ यासाठी हा आदेश लागू नाही. उत्सव, सभा, मिरवणूक यासाठी तहसीलदार/कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक राहील. शांतता भंग न करण्याची जबाबदारी आयोजकांची असेल.

## मीरा भाईंदर मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत
# जनजागृतीपर मनोरंजनात्मक कार्यक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त घकचरा व्यवस्थापन विभाग अंतर्गत Ending Plastic Pollution Globally म्हणजेच जागतिक प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन कार्यक्रम भारतरत्न गानसम्राज्ञी स्व. लता मंगेशकर नाट्यगृह येथे मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सफाई कर्मचा-यांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सेवानिवृत्त OSD, पर्यावरण तज्ज्ञ श्री. आनंद जगताप व श्री. सतिश भोसले यांनी या कार्यशाळेत प्रशिक्षण दिले. यानंतर मिरा भाईंदर शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवणारे स्वच्छता निरिक्षक अनिल राठोड, नितीन खैर, श्रीकांत पराडकर व सफाई कर्मचारी यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. जागतिक प्लास्टिक पिशवीचे निर्मूलन थीम असणाऱ्या या कार्यक्रमात प्लास्टिक बंदी विषयी जनजागृती करून प्लास्टिकला पर्याय म्हणून असणाऱ्या THAILA BAG उदघाटन करून वाटप करण्यात आले. आजच्या दिवशी मिरा भाईंदर शहरातील नागरिकांसाठी स्वच्छ



स्टार रँकिंग स्पर्धेचा शुभारंभ केला असून ३१ जुलै 2025 पर्यंत ही स्पर्धा असणार आहे. तसेच लवकरच मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे प्लास्टिक मुक्त मिरा भाईंदर हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. आजच्या या क्रार्यक्रमात रुबीक्स क्युब वापरुन कलाकार एनी आणि ॲथॉन यांनी ग्लोबल बीट प्लास्टिक पोल्युशन नावाच अनोख पोस्टर बनविले तसेच जागतिक प्लास्टिक पिशवी निमुर्लन या थीमला घेऊन कलाकरांनी एक उत्तम असा नुत्याविष्कार सादर करुन उपस्थितीत लोकांची मने जिंकली. तसेच, मिरा भाईंदर महानगरपालिका रिल स्पर्धेतील स्पर्धकांना आयुक्त,अतिरिक्त आयुक्त यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर पर्यावरणाचा सध्यास्थितीचा अहवाल 2023-24 आणि आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा मा. आयुक्त, अतिरिकत् आयुक्त् व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रसिद्ध करण्यात आला. यानंतर मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्तांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सगळयांना शुभेच्छा दिल्या तसेच आजच्या दिवशीच फक्त वृक्षारोपण न करता रोजच वृक्ष रोपण करून त्यांचे संगोपन आणि संवर्धन केले पाहिजे. तसेच प्रत्येक नागरिकाने आपली सामाजिक जबाबदारी समजून पर्यावरण पूरक काम करुन मिरा भाईंदर महानगरपालिकेला शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त यांनी केले.

# मुरबाड तालुक्यात विज पडून चार बैलांचा मृत्यू!
## आदिवासी शेतकऱ्यावर आस्मानी संकट!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
:: दिलिप पवार

**मुरबाड:** तालुक्यात विज पडुन चार बैलांचा मृत्यू!आदिवासी शेतकऱ्यावर नैसर्गिक संकट!मुरबाड-प्रतिनिधीमुरबाड तालुक्यातील टोकावडे आदिवासी दुर्गम भागातील केळेवाडी येथील एका आदिवासी शेतकऱ्याच्या 4 बैलांवर वीज पडल्याने या चार बैलांचा जागीच मृत्यू झाला. या संकटात सापडलेल्या आदिवासी शेतकऱ्याला शासनाकडून सर्वतोपरी मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याची माहिती तहसीलदार अभिजित देशमुख यांनी दिली. टोकावडे परिसरातील केळेवाडी (वाल्हीवरे) येथिल शेतकरी गोविंद खाकर हा आपले 4 बैल जंगलात चारायला घेऊन जात असताना शुक्रवारी संध्याकाळी साडेपाच च्या सुमारास त्यांच्यावर अचानक वीज पडली आणि त्यात गोविंद खाकर यांचे 4 ही बैल जागेवरच मृत्युमुखी पडले. सुदैवाने शेतकरी गोविंद खाकर याचे प्राण वाचले.



ही दुर्घटना समजताच माजी पंचायत सदस्य अनिल घरत , प्रकाश पवार,यांनी घटनास्थळी धाव घेत पशुसंवर्धन अधिकारी डॉक्टर कवटे, तहसिल प्रतिनिधी यांनी रितसर पंचनामा केला संबंधित शेतकरी गोविंद खाकर यांच्या सोबत आमदार किसन कथोरे व तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी फ़ोन वरती सांत्वन करत दिलासा दिला तसेच नुकसान भरपाई म्हणून आ. किसन कथोरे, तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी तात्काळ कार्यवाही करीत आगामी आठवडयात शासनाची मदत देण्याची ग्वाही दिली.

# वडवली येथे विकसित कृषी संकल्प अभियान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
:: बाळासाहेब भालेराव

**मुरबाड दि.८ :** कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन आत्मा ठाणे व कृषी विज्ञान केंद्र नागाव यांच्या संयुक्त विद्यमाने ७ जून२०२५ रोजी विकसित कृषी संकल्प अभियान कार्यक्रम मौजे वडवली तालुका मुरबाड येथे संपन्न झालेला आहे. सदर कार्यक्रमासाठी डॉ. एस के शुक्ला डायरेक्टर (CIRCOT) मुंबई तसेच एस के रॉय डायरेक्टर अटारी पुणे हे विशेष करून उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी प्रकल्प उपसंचालक मनाली तांबडे तसेच कृषी विज्ञान केंद्र नागावचे प्रमुख डॉ.सुरेश



जगदाळे सर व इतर शास्त्रज्ञ उपस्थित होते.सदर कार्यक्रम खरीप हंगामा बरोबर रब्बी हंगामातही राबवण्यात येईल असे मत डॉ. एस के शुक्ला यांनी व्यक्त केले तसेच एस के रॉय यांनी या अभियानामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे व शेतकऱ्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी मदत होऊ शकले असे अभिप्राय मांडले. प्रकल्प उपसंचालक तांबडे यांनी तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान एन एम एन एफ व इतर सेंद्रिय शेतीचे योजनांचे महत्व उपस्थित शेतकऱ्यांना पटवून दिले.सेंद्रिय शेतीमुळे जमिनीचे आरोग्य,मानवी आरोग्य व ग्राहकांच्या आरोग्य सुधारण्यासाठी मदत होऊ शकते असा विश्वास यावेळी व्यक्त केला. नैसर्गिक शेती हे अभियान सद्यस्थितीत शेतकऱ्यांना अंगीकारणे जरी नवीन वाटत असले तरी ते कालांतराने खूप फायद्याचे आणि चिरकाल यशस्वी प्रयोग होऊ शकतो अस मत यावेळी व्यक्त करण्यात आले. नैसर्गिक शेती करत असताना प्रत्यक्ष शेतकरी त्याच्या असलेल्या क्षेत्रापैकी काही क्षेत्र नैसर्गिक शेती पद्धतीने करतो उर्वरित क्षेत्र व त्याच्या पद्धतीने करतो असे यामध्ये प्रामुख्याने सुरुवात करावी लागते सेंद्रिय शेती तसेच नैसर्गिक शेतीमध्ये निविष्ठा या बांधावर तसेच शेतामध्ये तयार करूनच वापरावे लागतात व शेतकरी त्याच्या पद्धतीने करत असलेल्या शेतामध्ये लागणाऱ्या निविष्ठा बाहेरून आणाव्या लागतात असे स्पष्ट मार्गदर्शन यावेळी प्रकल्प उपसंचालक तांबडे मॅडम यांनी केले कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉक्टर सुरेश जगदाळे यांनी यावेळी विकसित कृषी संकल्प अभियान ३० मे पासून प्रत्येक दिवशी तीन गावे शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन सर्व योजनांची इत्यंभूत माहिती देण्यात आली. याबाबत सविस्तर वृत्तांत सांगण्यात आला तसेच कृषी विज्ञान केंद्र मार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती यावेळेस देण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी मुरबाड तालुका कृषी अधिकारी नामदेव धांडे , कुरलें सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक व दीपक वाघ मंडळ कृषी अधिकारी व इतर कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## विजेच्या धक्क्याने ठाण्यातील इसमाचा दुर्दैवी मृत्यु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** प्रतिनिधीठाणे शहरातील लोकमान्य नगर, सावरकर नगर परिसरात दाटीवाटीची वस्ती असल्यामुळे येथे विजेच्या व इतर समस्या निर्माण होत आहेत. अशातच चंद्रकांत दळवी चाळ, ठाणे महानगरपालिका शाळा क्र.120, सावरकर नगर येथील रहिवाशी अनिल कश्यप यांचा विजेचा धक्का लागून अपघाती दुर्दैवी मृत्यु झाला.

अनिल कश्यप यांचे शेजारील घरामध्ये फॅनमध्ये शॉर्टसर्किट झाले. कश्यप व शेजारील घराचे छताला सामाईक लोखंडी खांब होता. सदर लोखंडी खांबद्वारे कश्यप यांचे घराचे छतात वीज पुरवठा झाल्याने कश्यप स्वत:चे घराचे पहिल्या माळयावरून शिडीचे साह्याने खाली येत असताना विजेचा धक्का लागून ते घरात पडले. घरात एकटेच असताना विजेचा धक्का लागल्याची कल्पना आली नाही. त्यांचा मुलगा सागर याने घरात जाण्यासाठी दरवाजा वाजवला पण आवाज येत नसल्याने त्याने खिडकीद्वारे घरात प्रवेश केला. त्याने सुद्धा शिडीला धरताच त्यालाही विजेचा धक्का लागला. परिसरातीत नागरिकांनी दोघांनाही हॉस्पिटल मध्ये दाखल केले परंतू फार वेळ झाल्यामुळे अनिल कश्यप यांचा मृत्यू झाला. सदर घटनेबाबत महावितरणच्या अधिकारी यांनी पंचनामा करून वर्तक नगर पोलीस स्टेशनला कळवले आहे. अनिल कश्यप यांचे पश्चात पत्नी लक्ष्मी व मुलगा सागर असा परिवार आहे.माजी नगरसेवक दिलीप बाटटक्के यांनी सदरचे कुटुंबास भेट देऊन परिवारास धीर देण्याचा प्रयत्न केला.



गृप ग्रामपंचायत नडगाव दानबाव सरपंच मँडम सौ.आरुणा सतिश चौधरी यांनी मुरबाड विधानसभा आमदार माननिय श्री.किसनजी कथोरे साहेब यांची सदिच्छ भेट घेऊन ग्रामपंचायत मधिल सर्व वार्ड मधिल विकासाची नविन कामे, रस्ते, दिवाबत्ती यांचे पत्र दिले. तसेच शेतक-यांनसाठी शासकिय योजने बाबत चर्चा करण्यात आली.त्याबद्दल रस्त्या साठी 2 कोटी रुपयाची निधी दिल्याची माहिती साहेबांनी या वेळी दिली.त्याच बरोबर या पुढील काळात विकास कामासाठी कायम पाठीशी असल्याचे आश्वासन या वेळी साहेबांनी दिले.

## अपघात ग्रस्त शिक्षकांना उपचारासाठी सर्वतोपरी मदत
**- शिक्षण मंत्री दादा भुसे**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता :

आज सकाळी चिपळूण मध्ये वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी जाणाऱ्या शिक्षकांच्या बसला अपघात झाला, त्यामध्ये अनेक शिक्षक गंभीर जखमी झालेले आहेत,अत्यंत दुर्दैव अशी घटना असून , सदर घटनेची माहिती आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे साहेब यांना दिले आहे, त्यांनी जखमी शिक्षकांना उपचारासाठी कुठे काही कमी पडू देणार नाही असे शिक्षणमंत्र्यांनी सांगितले आहे. तसेच माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशी सुद्धा संपर्क सुरू आहेसर्वांनी काळजी करू नये , सर्व यंत्रणांशी बोलणे सुरू आहे.

## आंबिवली स्थानक परिसरात पावसाच्या जलसंचयाने नागरिकांमध्ये नाराजी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील "अ" प्रभागातील आंबिवली रेल्वे स्टेशनच्या पूर्व भागात रिक्षा स्टँड समोरच्या मुख्य रस्त्यावर दरवर्षी पावसाळयात पावसाच्या पाण्याचा निचारा होत नसल्याने तुंबापुरीमुळे गंभीर समस्या निर्माण होते. या भागातून टिटवाळा, मोहने, आंबिवली, अटाळी, बल्याणी, उंभर्णी आणि कल्याणकडे जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणावर रहदारी असते. परंतु गेल्या तीन चार वर्षांपासून या ठिकाणी कायमस्वरूपी पावसाचे पाणी साचत असल्याने रस्त्यावरील साचलेल्या पाण्याने नागरिक आणि वाहनचालक प्रचंड त्रस्त झाले आहेत.

"स्थानिक नागरिक व रिक्षा चालकांचे म्हणणे आहे की, याठिकाणी पूर्वी पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी एक मोठी गटार होती. मात्र, सध्या या भागात सुरु असलेल्या विकासकाच्या विकास प्रकल्पामध्ये ती गटार बंद करण्यात आली, ज्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्याचा मार्गच खुंटला आहे. परिणामी, रस्त्यावर पाणी साचून ट्रॅफिक जॅम, रिक्षा बंद, पादचाऱ्यांची गैरसोय अशा समस्या निर्माण होत आहेत."

स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त करत म्हटले, "रिक्षाचालक आता चौकात पाणी काढून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करत आहेत. ही प्रशासनासाठी अत्यंत शरमेची बाब आहे." तसेच, जर मुख्य रस्त्यांची ही अवस्था असेल तर अंतर्गत गल्ल्या, वसाहतींची काय अवस्था असेल याची कल्पना करता येते, असा सवालही नागरिकाकडून होत आहे.

आंबिवली स्टेशन पूर्व जवळील रस्त्यावर होणारी पावसाच्या पाण्याचा निचरा होत नसल्याने रस्त्यावर साचणार्या पाण्याची तुंबापुरी टाळण्यासाठी उपाययोजना करीत जुन्या गटाराची शोध घेत साचणार्या पाण्याचा प्रवाहाचा मार्ग मोकळा केला पाहिजे , नव्याने जलनिसारण यंत्रणा व्यवस्था केली गेली पाहिजे,नियमित नालेसफाईसाठी स्वतंत्र पथक नियुक्त करणे, या बाबींची तात्काळ अंमलबजावणी व्हावी अशी जोरदार मागणी आता नागरिक करीत आहेत.

"पावसाळा सुरू झाला असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी, वाहतूक सुरळीत राहण्यासाठी आणि रस्त्यांची दुरवस्था टाळण्यासाठी, पाण्याचा निचारा होण्यासाठी पालिकेने तत्काळ कारवाई करणे गरजेचे आहे असे समाजसेवक दिपक सकपाळ यांनी संपर्क साधला असता सांगितले."




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com